# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.२५/०४/२०२४

**महामार्गावरील जलसंकट रोखण्यासाठी बैठक**
**एक महिन्यात काम करण्याचे महामार्ग प्राधिकरणासह इतर विभागांना निर्देश**

महामार्गावरील जलसंकट रोखण्यासाठी वसई विरार महानगरपालिका आयुक्तांनी महामार्गप्राधिकरण, रेल्वे, वनविभाग, महावितरण, डीएफसीसी आदी विभागांची बैठक महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. पालिकेच्या पथकाने महामार्गावर केलेल्या पाहणी दौऱ्यानंतर समोर आलेल्या समस्या दुर करण्यासाठी कामांचे निर्देश दिले असून कामासंदर्भात विविध सुचना केल्या आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी एक महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग हा प्रमुख महामार्ग असून त्यावरून दररोज हजारो वाहने ये-जा करत असतात. मात्र गेल्या काही वर्षापासून हा महामार्ग पावसाळ्यात पाण्याखाली जाऊ लागला आहे. महामार्ग जलयम झाल्याने तासनतास वाहतूक कोंडी होत असते. येत्या पावसाळ्यात ही समस्या उद्भवू नये यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच महामार्गाला भेट देऊन पाणी साचण्याच्या कारणांचा शोध घेतला होता. त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली महावितरण, महामार्ग प्राधिकरण, वनविभाग, रेल्वे, वाहतूक पोलीस आणि डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन (डीएफसीसीएल) आदी विभागाबरोबर संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयुक्तांनी विविध विभागांना कामांचे निर्देश दिले आहेत.

महामार्गावरील पाणी साचून वाहतूक ठप्प होत असते. यासाठी महामार्गालगत असलेला राडारोडा साफ करणे, वासमारे पूल (रेल्वे क्रॉसिंग) जवळ असलेल्या दुभाजकामधील दगड, माती साफ करण्याचे निर्देश दिले आहेत. महामार्गाजवळील सनशाईन हॉटेल, रेल्वे क्रॉसिंग, न्यू फाऊंटन सिटी आदी १४ प्रमुख ठिकाणी नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करणे, नैसर्गिक नाले साफ करणे, पाणी जाण्याचे मार्ग तयार करणे आदी कामांचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय महामार्गावर डि वॉटर पंपिगची व्यवस्था करणे, पाणी जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग (ड्रेन लाईन) तयार करणे आदी सुचना देण्यात आल्या आहेत. महामार्गालगत भूमीगत वीज वाहक तारा उघड्या असतील तर त्या संरक्षित करणे, आदी सूचना महावितरणाचा देण्यात आल्या आहेत. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन तर्फे अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. त्यामुळे पाणी साचून दुर्घटना होऊ शकतात. त्यामुळे डीएफसीसीए ने कामे सुरू असलेल्या ठिकाणी योग्य त्या उपायोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. डीएफसीसीएलने भराव काढण्याचे काम केले नाहीतर आपत्ती व्यव्यस्थापन कायद्या अंतर्गत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे, असे कडक निर्देशही आयुक्तांनी यावेळी दिले.

**महामार्गावर आपतकालीन नियंत्रण कक्ष उभारणार**

महामार्गावरील १४ ठिकाणांवर उपाययोजना करण्याबरोबर संपूर्ण महामार्गावर पेट्रोलिंग वाहने, रुग्णावाहिका आणि क्रेन तयार ठेवणे तसेच २४ तास कार्यरत राहणारा आपतकालीन व्यवस्थापन कक्ष तयार करावा अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

## भूस्खलन आणि दरड दुर्घटना रोखण्याचे निर्देश

महामार्गालगत मोठ्या प्रमाणावर वनजमिनींवर अतिक्रमण झाले आहे. डोंगर पोखरून बांधकामे झाली आहेत. पावसाळ्यात दरड कोसळून दुर्घटना होत असतात. त्यामुळे पालिका आयुक्तांनी वनविभागाला विविध सूचना केल्या आहेत. वनखात्याच्या अंतर्गत असेलल्या नाल्यांची साफसफाई करणे, भूस्खलन होण्याची ठिकाणी शोधून तेथील रहिवाशांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे आणि अशा ठिकाणी अतिक्रमणे झाली असतील ते निष्काषित करावी अशा सूचना आयुक्तांनी या बैठकीत दिल्या आहेत.

महावितरणाच्या अनेक ठिकाणी वीज वाहक तारा या धोकादायक अवस्थेत आहेत. अशा तारा घडून दुर्घटना घडत असतात.

महापालिकेच्या हद्दीतील नालेसफाईचे काम यापूर्वीच सुरू करण्यात आले आहे. महामार्गावरील विविध समस्या सोडविण्यासाठी पालिकेच्या अतिक्रमण विभाग, आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांना देखील आयुक्तांनी कामांचे निर्देश दिले आहेत. सर्व विभागांच्या समन्वयाने ही कामे केली जातील असा विश्वास आयुक्त अनिलकुमार पवार यांनी व्यक्त केला आहे.

पावसाळ्यातील शहरातील जलसंकट आणि संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी आता वसई विरार महापालिकेने सर्व विभागांना एकत्र घेऊन काम करण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच भाग म्हणून रेल्वे, वनखाते, महामार्गप्राधिकरण, महावितरण आदी विभागांची बैठक घेऊन कामांचे निर्देश दिले आहेत. पुढील एक महिन्यात ही कामे करण्यात येणार आहेत.

पावसाळ्यात शहर जलमय होण्याबरोबरच भूस्खलन होणे, सखल भागात पाणी साचणे, वीजेचा धक्का लागणे, दरड कोसळणे, वाहतूक व्यवस्था ठप्प होणे, महामार्गावर पाणी साचणे आदी विविध समस्या निर्माण होत असतात. पालिकेचा आपतकालीन विभाग या काळात सज्ज असतो तसेच पालिका विविध उपाययोजना करत असते. मात्र, यंदा ही समस्या दूर करण्यासाठी पालिकेने सर्व महत्वाच्या विभागांसमवेत समन्वय साधून उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा या कामांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**